International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—5 RNI : RAJBIL/2009/30097

शोध पत्र-मराठी

Feb, 2010

# मराठीलोकरंगभूमीः परंपरा आणि स्वरूप

* प्रा. डॉ. माधव बसवंते

*मराठी विभाग, इंदिरा गाँधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको

**प्रास्ताविक**

समाज प्रबोधन आणि लोकरंजनासाठी प्राचीन काळापासून लोकरंगभूमीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या काळातील समाजाच्या रुढी परंपरा लोकरंगभूमीवर साकार झाल्या आहेत. समाजाच्या वर्तनाचे प्रतिबिंब लोकरंगभूमीच्या माध्यमातून प्रभावीपणे दिसून येते. लोकरंगभूमी ही खऱ्या अर्थाने प्रभावी संवाद माध्यम म्हणून वापर झाल्याचे दिसून येते. लोकरंगभूमीवरील नाट्यपरंपरा आदिम काळापासून प्रारंभ झाल्याचे दिसते. भारतातील आदिम जमातींनी या रंगभूमीचा प्रारंभ नृत्याने केला आहे. रामायण-महाभारतातही रंगभूमीवरील नाटकाचे उल्लेख सापडतात. लोकजीवनातील अनेक रुढी-परंपरा यांचे समग्र दर्शन लोकरंगभूमीतून स्पष्टपणे दिसून येते. या लोकरंगभूमीमध्ये पारंपरिक लोकरुढीतील लोकाविष्कार, आदिवासींची नृत्यनाट्ये, भारुडे, गोंधळ, देवतावतरनाचे नाट्य, दशावताराचे नाट्य, जागरणाचे विधीनाट्य, कीर्तन, कथाकथन, पथपाट्य, कळसूत्री भावल्यांचा खेळ, तमाशा यासारख्या अनेक कलाविष्काराच्या माध्यमातून समाजाच्या बदलत्या परिवर्तनाचे दर्शन होते. म्हणजेच मराठी लोकरंगभूमी हे केवळ मनोरंजनाचे व्यासपीठ नाही तर भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांची वैचारिक जाणीव करुन देणारे एक प्रबोधनात्मक व्यासपीठ आहे.

**लोकरंगभूमी : प्रभावी लोकशिक्षण**

प्राचीन काळापासून भारतात लोकशिक्षणाची परंपरा आहे. या लोकशिक्षणाच्या माध्यमातून तत्कालीन परिस्थितीतील लोकसमूहाच्या भावनिक आविष्काराचे दर्शन होते. एका पिढीचे ज्ञान दुसऱ्या पिढीला देण्याचे काम समाजात अव्याहतपणे घडत असते. हे पारंपरिक लौकीक ज्ञान शास्त्रीय ज्ञानाच्या स्वरुपापेक्षा वेगळे असते. या ज्ञानामुळे समूहाचे भूतकाळाचे नाते कायम ठेवल्या जाते. म्हणून लोकरंगभूमी हे पारंपरिक लोकाविष्काराची प्रभावी संस्था असून लोकशिक्षणाचे एक माध्यम म्हणून या संस्थेचा लौकिक आहे. अशा या पारंपरिक लोकाविष्कारातून समाजाला मूल्यशिक्षण दिले जाते. सामाजिक संकेताची जाणीवही या लोकाविष्कारातून जाणीवपूर्वक दिली जाते. अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम म्हणून लोकरंगभूमीचा उल्लेख केला जातो. समाजात नवे-नवे आदर्श निर्माण करण्यासाठी लोकरंगभूमीचे उल्लेखनीय योगदान आहे.

लोकरंगभूमीवरील तमाशा या कलाप्रकारानेही समाजात व्यावहारिक ज्ञान व आधुनिक जीवनमूल्ये जाणीवपूर्वक दिली जातात. सत्यशोधकी तमाशा या कलाप्रकारांनी महाराष्ट्रात अनेक सत्यशोधकी शाहीर निर्माण झाले. या सत्यशोधकी तमाशातून अनेक सत्यशोधक शाहीरांनी धर्म-भोळेपणा, सावकार, जातीभेद, ब्राह्मणांचे वर्चस्व, शेतकऱ्यांची पिळवणूक यासारख्या विषयातून सामाजिक वास्तवता अधोरेखित केली आहे. त्याचबरोबर या शाहीरांनी आपल्या सत्यशोधकी तमाशातून समाज जागरणाचे कार्य केले आहे. सत्यशोधकी तमाशे यातूनच प्रेरणा घेऊन पुढे आंबेडकरी जलसेचा प्रारंभ झाला. या आंबेडकरी जलशातून दलितांमध्ये जागृती निर्माणाचे कार्य करण्यात आले. सत्यशोधकी तमाशे व आंबेडकरी जलसे यांचे कार्य समांतर चालल्याचे दिसून येते. मात्र आंबेडकरी जलशांची प्रेरणा ही महात्मा फुले यांच्या तृतीयरत्न व अखंडादी रचना ही होती.

**लोकरंगभूमीवरील कीर्तन**

महाराष्ट्रातील सांस्कृतिक संस्थेमध्ये कीर्तन संस्थेला विशेष महत्व आहे. हिंदू संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करण्यात कीर्तनकारांचे उल्लेखनीय योगदान आहे. समाजाला उपदेश करण्यासाठी महाराष्ट्रातील आणि भारतातील अनेक संतांनी कीर्तनाचा प्रभावी वापर केला आहे. केवळ उपदेशच नव्हे तर माणसामध्ये धार्मिक सहिष्णूता, धर्मनिरपेक्षता, समानता, मानवता आणि पर्यायाने राष्ट्रीय एकात्म भावनेच्या जागृतीसाठी कीर्तनाचा उपयोग झाला आहे. वैदिक काळापासून कीर्तन परंपरा हा एक भक्तीप्रकार म्हणून प्रचलित आहे. भक्तीच्या नवविधा प्रकारात कीर्तनाचा दुसरा क्रमांक सांगितला जातो. भारतातील निरनिराळ्या प्रांतात कीर्तनाचे वेगवेगळे अर्थ व प्रकार दिसून येतात. कर्नाटकामध्ये इ.स. चौदाव्या शतकात

कीर्तन हा प्रकार भक्तिसंगीताचा एक प्रकार म्हणून निर्माण झाला. बंगालमध्ये कीर्तन हा लोकनृत्याचा प्रकार आहे. एकंदरीत भारताच्या विविध भागात संवादाचे एक प्रभावी माध्यम म्हणून कीर्तनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून उपयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर लोकशिक्षणासाठीही कीर्तन संस्थेचा आधार घेतला जातो. प्रभावी वक्तृत्वाने कीर्तन प्रभावी होते. अशा या कीर्तनातील नाट्य विविधांगी असते. अभिनय, नेत्रविक्षेप, मुद्राविक्षेप, हावभाव यासारख्या गुणांमुळे कीर्तन अर्थपूर्ण व प्रभावी केले जाते. पूर्वरंग आणि उत्तररंग ही कीर्तनाची दोन अंगे आहेत. या पूर्वरंगात तत्त्वज्ञान निरुपण केले जाते, तर उत्तररंगात वेगवेगळे दाखले दिले जातात. कीर्तनाचे स्वरुप हे साधारणतः एकपात्री नाट्य प्रयोगाप्रमाणेच असते. कीर्तनकाराचा पोशाख परंपरेने ठरलेला असतो. कीर्तनकार संमिश्र भाषा वापरतात. कीर्तन ही कला आत्मसात करणारे कीर्तनकार हे भिन्न-भिन्न जाती धर्माचे असतात. दारुबंदी, व्यसनमुक्ती, स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाचे विषय बनविले. पुरुष व महिला हे दोघेही कीर्तनकार असतात. भारतात अनेक संप्रदायाचे कीर्तनकार आहेत. आज आधुनिक काळात एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून कीर्तनाचा वापर केला जात आहे. समाज प्रबोधन, उद्‌बोधन, जाणीव जागृती, लोकरंजन, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेरणा यासाठी कीर्तनाचा उपयोग केला जातो.

**आदिवासींची नृत्यनाट्ये**

भारतातील आणि महाराष्ट्रातील आदिवासींचे जीवन उपेक्षित व दारिद्र्यमय आहे. या आदिवासी जमाती जंगलातील अनेक डोंगरदऱ्यात वस्ती करुन राहतात. त्यांची जगण्याची विशिष्ट पद्धत आहे, या आदिवासी जमातीने आपल्या संस्कृतीचे रक्षण करताना दिसून येते. महाराष्ट्रातील अशा या आदिवासी जमातीचे लक्षण सांगावयाचे झाल्यास 'गाणाऱ्या आणि नाचणाऱ्या जमाती' असे सांगितले तर त्यांच्या उत्साही जीवनाचे आपणास दर्शन होईल. आदिवासी समाज हा केवळ मनोरंजनासाठी किंवा करमणूक करण्यासाठी नृत्य करीत नाही तर सुख आणि दुःखाच्या प्रसंगीही ही आदिवासी जमात आपल्या कलेच्या माध्यमातून आपल्या भावनाविष्कार प्रगट करतात. अशा या आदिवासींच्या नृत्य-संगीताचा उगम धर्मभावनेतून झाल्याचे दिसून येते. धार्मिक विधीच्या वेळी त्यांची नृत्य करण्याची प्रथा आहे. या नृत्याच्या माध्यमातून देवतांची आराधना व त्यांना संतूष्ट करण्याचा प्रयत्न करतात. महाराष्ट्रातील गोंड, कोलाम, ठाकर, वारली, कोरकू यासारख्या अनेक आदिवासी जमाती आपल्या आगळ्या-वेगळ्या पारंपंरिक पद्धतीने नृत्य करतात. ही त्यांची नृत्य कला एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जाताना दिसून येते. महाराष्ट्रातील भिल्ल ही जमात होळीच्या सणाला नृत्यनाट्य करतात. आदिवासीतील 'मादळ' हा नाट्यनिधीतील एक भाग आहे. आदिवासींच्या या मादळ नाट्यविधीत त्यांचे जीवन प्रतिबिंबीत होते. म्हणून मादळ हे आदिवासींचे जीवन दर्शन घडविणारे उद्‌बोधन व रंजक कलाविष्कार आहे. आदिवासींचे सण, उत्सव, लग्नप्रसंग अशा प्रसंगी मादाळासारख्या नृत्य नाट्याबरोबरच भवाडा यासारख्या मुखवट्यांचे नृत्यनाट्ये सादर केली जातात. हे भवाडा नृत्यनाट्ये महादेवकोळी, भिल्ल, कोकणाठाकूर यासारख्या आदिवासी जमातीमध्ये दिसून येतात. भवाडा हे देवतावतरणाचे विधीनाट्ये म्हणून आदिवासी जमातीत प्रचलित आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील आंध, गोंड, कोलाम या आदिवासी जमातीमध्ये 'दंडार' हा लोकनृत्याचा प्रकार दिसून येतो. अशा या दंडार नाट्यामुळे गावात सुख-समृद्धीबरोबरच शांती लाभते आणि कोणतीही संकटे येत नाहीत. अशा आदिवासी जमातीचा समज आहे. या दंडार नृत्यात स्त्रीया सहभाग घेत नाहीत. त्यांचा सहभाग नृत्यासोबत गाणे म्हणण्याचा असतो. या दंडार नृत्यात गोफ व घोरपडी हे नृत्य प्रकार असतात. अशा या आदिवासी जमातीचा निसर्ग आणि ऋतू यांच्या बदलांशी व धर्मविधींशी त्यांचा घनिष्ठ संबंध असतो. आदिवासींच्या नृत्यनाट्याला रंगमंच नसतो. तर मैदान व रस्ता हीच त्यांची रंगभूमी असते.

**पथनाट्याविष्कार**

महाराष्ट्रात परंपरेने चालत आलेल्या अनेक नाट्यात्मक संस्था आहेत. प्राचीन काळात अशा प्रकारचेही नाट्यप्रयोग रस्त्याच्या कडेला, गर्दीच्या ठिकाणी, यात्रा, उत्सव, बाजार यासारख्या ठिकाणी होत असत. बदलत्या परिस्थितीनुसार पथनाट्याच्या स्वरुपात बदल झाल्याचे दिसून येते. अशा या नाट्यात्मक आविष्कारात पथनाट्याचे प्रामुख्याने तीन वर्ग दिसून येतात. त्यात धर्मभावनेशी संबंधीत पथनाट्ये, मनोरंजनात्मक पथनाट्ये व उद्‌बोधक पथनाट्ये यांचा समावेश होतो. पोतराजाचे पथनाट्य, जादूविषयक नाट्य असे प्रयोग यात दिसून येतात. अशा या पथनाट्याचा प्रेक्षक ठरलेला नसतो. गर्दी जमा करुन गर्दीला एका सूत्रात बांधून ही पथनाट्ये सादर केली जातात. रस्ता हाच या पथनाट्याची रंगभूमी असते. पथनाट्याच्या सूत्रधाराला पथनाट्याचे नियोजन करावे लागते. पथनाट्य ही एक सामूहिक कृती असते. व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, साक्षरता प्रसार, हुंडाबंदी, सामाजिक प्रबोधन, स्वच्छता यासारख्या विषयावर पथनाट्य प्रभावीपणे सादर करुन लोकशिक्षण दिले जाते.

**गोंधळ नाट्यविषयी**

महाराष्ट्रातील लोकधर्मात गोंधळ नाट्यविधीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. गोंधळी ही भटक्यांचे जीवन जगणारी एक जात आहे. देवीच्या उपासनेचा एक भाग म्हणून गोंधळी जातीचे लोक जे कूलाचार पार पाडतात त्यालाच 'गोंधळ' असे म्हणतात. गोंधळ हा आता विधी राहिलेला नसून तो आता एक नाट्याविष्कार झाला आहे. मराठे, कुंभार, कमदराई व रेणूराई या गोंधळ्यांच्या पोटजाती आहेत. खानदेशात वासूदेव जोशी स्वतःला गोंधळी समजतात.

'गोंधळ' या नाट्यविधीत गोंधळी स्त्रियांचा सहभाग नसतो. गोंधळाचे प्रामुख्याने तीन प्रकार असून उत्तम, मध्यम व कनिष्ठ हे गोंधळाचे प्रकार सांगितले जातात. आज आधुनिक काळात काकड्या गोंधळ व सबळ्या गोंधळ हे प्रकार सांगितले जातात. काकड्या गोंधळ हे कोणत्याही जातीचे लोक करतात तर सबळ्या गोंधळ हे गोंधळी जातीचे लोकच घालतात. 'गोंधळ' हा शब्द 'गडबड' या अर्थाने वापरला जात असला तरी भारतात अगदी प्राचीन काळापासून देवीची स्तूती करण्याच्या उद्देशाने या गोंधळ नाट्यविधीचे मूळ सांगता येईल. ज्ञानेश्वरीत 'गोंधळ' हा शब्द 'पिशाच' या अर्थाने वापरला आहे. सबळ व तूणतूणे ही गोंधळाची प्रमुख वाद्ये असतात. गोंधळाची गाणी विविधतापूर्ण असतात. गोंधळ्यांच्या या सादरीकरणात वेषभूशा व रंगभूषा करण्यात येत नाही, तर त्यांच्याजवळ असणारे पागोटे किंवा उपरणे यांच्या सहाय्यानेच वेषभूषा व रंगभूषेचा आभास निर्माण केला जातो.

**लोकरंगभूमीचे भवितव्य**

सामाजिक परिवर्तनाबरोबरच लोकरंभूमीवरील लोकाविष्काराचे व्यावसायिकरण होत आहे. त्यामुळे या लोककलांचे आजच्या आधुनिक काळात बाजारीकरण झाले आहे. सामाजिक प्रबोधनाच्या या युगात समाजपरिवर्तनाच्या या प्रक्रियेला वेग आला आहे. या परिवर्तनाच्या चक्रात लोकरंगभूमीवरील पारंपंरिक नाट्याविष्कार लोप पावताना दिसून येत आहे. अशा या पारंपंरिक रंगभूमीकडे कमालीचे दुर्लक्ष झाले आहे. प्राचीन भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, उत्साहाचे रक्षण व जतन करणाऱ्या संस्कृतिमय लोकरंगभूमीचा नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मराठी लोकरंगभूमीच्या या घटकांना आजच्या आधुनिक युगात प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. अन्यथा प्राचीन भारतातील संस्कृतीची ओळखच नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून समाजपरिवर्तनाच्या गतीबरोबरच लोकरंगभूमीला नवा चेहरा प्राप्त करुन देण्यासाठी सर्वांनीच पुढे आले पाहिजे. तरच या मराठी लोकरंगभूमीचे भवितव्य पुन्हा एकदा नव्याने उभारु शकेल हे वास्तव नाकारता येत नाही.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) दाते ए.रा., कर्वे, चि.गं., महाराष्ट्र शब्दकोश, विभाग दुसरा.
२) खराट संभाजी, सत्यशोधकी जलसे.
३) डॉ. किरवले, दलितांची शाहिरी कविता.
४) प्रा. ठाकूर भगवान, आंबेडकरी जलसे, (एम.फिल. मराठी शोधप्रबंध)
५) डॉ. सहस्त्रबुद्धे अनिल, लोकसाहित्य विचार
६) डॉ. मांडे प्रभाकर, लोकरंगभूमी - परंपरा, स्वरुप आणि भवितव्य
७) डॉ. ढेरे, रा.चिं., लोकसंस्कृतीचे उपासक
८) Varhadpande, M.L., Tradition & Indian Theatre